मे २०१५ | ₹ ४० | पुणे, वर्ष ५ | अंक ०६

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

# अर्थपूर्ण

‘करा ना राया क्रांती’ आणि मी

१000,५00 रुपयांच्या नोटा आणि सरकार

शेती-चिंता आणि चिंतन

करांच्या जंजाळ्यात सरकार!

आर्थिक स्वातंत्र्यासाठी चला रिझर्व बँकेत

पोस्ट बँकेमुळे चेहरा मोहरा बदलेल

ऑनलाइन बँकिंगचे फायदे

मी अर्थक्रांतीचा समर्थक का आहे?

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
११, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११०३८
फोन : ०२०- २५४३०५४०
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

मे २०१५

वर्ष पाचवे
अंक सहावा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
०२०-२५४३०५४०
९९२१९२६५३८
arthapurna.monthly@gmail.com

**वितरण आणि जाहिरात संपर्क**
प्रशांत देशपांडे
९८५०२३३७७७
विजय दबडगावकर
९८९०१००९८४
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

# अनुक्रमणिका

०४ करांच्या जंजाळ्यात सरकार !...यमाजी मालकर
०६ (करा ना राया) क्रांती आणि मी...प्रदीप वैद्य
०८ अर्थमंत्री तेच म्हणतात, हा बदल ते कसे करणार, हे सांगत मात्र नाहीत!
०९ रघुराम राजन यांच्यावर ही वेळ का आली ?
१२ मी अर्थक्रांती प्रस्तावाचा सक्रिय समर्थक का आहे?...(कै.) अरुण जोशी
१५ शेती-चिंता आणि चिंतन...अभय भंडारी
१८ आर्थिक स्वातंत्र्यासाठी चला रिझर्व बँकेत...
१८ काळ्या पैशांच्या विरोधात एक पाउल पुढे...
१९ बनावट नोटा कोठून आणि का येतात?
२० अर्थक्रांती न्यूज
२२ अर्थभान
२६ अर्थक्रांतीच्या दिशेने
२९ गुंतवणूक करण्यासाठीच्या चांगल्या ५० कंपन्या

## भूमिका

# करांच्या जंजाळ्यात सरकार !



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**देशाच्या जीडीपीतील करांचे प्रमाण वाढले पाहिजे, हे सरकारला आणि तज्ज्ञांना कळते आहे आणि ते जाहीरपणे व्यक्तही केले जाते आहे. मात्र कर पद्धतीत आमुलाग्र बदलाची प्रक्रिया सुरु करण्याचे धाडस नसल्याने सरकारच करांच्या जंजाळात सापडले आहे. गंभीर आजार झाल्याचे तर मान्य आहे, मात्र त्यावर उपाय असलेले ऑपरेशन करण्याची तयारी नाही! या गंभीर आजारामुळे सारा देश पोखरला जातो आहे, त्याचे काय?**

आज साडेसहा कोटी म्हणजे महाराष्ट्रापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या फ्रान्सने कधी एके काळी वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी कर शोधला आणि आपले करविषयक प्रश्न सोडविले. आता फ्रान्सपेक्षा २०पट लोकसंख्या असलेला भारत जीएसटी करपद्धती लागू करण्यासाठी धडपडतो आहे. आपला देश वेगळा आहे, त्याचे प्रश्न वेगळे आहेत आणि ते वेगळ्या पद्धतीने सोडविले पाहिजे, याचे भान न राहिल्याने आपण सतत अडचणीत सापडतो आणि मदतीसाठी पुन्हा पाश्चात्य देशांची याचना करतो. हे दुष्टचक्र लवकर थांबले पाहिजे. हे कसे थांबणार, असा विचार केला की लक्षात येते की आज सर्व जग ज्या पैशाला ओळखते, तो पैसा म्हणजे 'अर्थ' सर्वांना कळला पाहिजे. तो कळला की समाज म्हणून आम्हाला नेमके काय हवे आहे, ते भारतीय नागरिक सांगू शकतील. आज सार्वजनिक प्रश्नांचे जे ढीग पडले आहेत, त्याचे कारण हे अर्थाचे अज्ञान आहे.

गेल्या काही दिवसांत ते समजून घेण्याची समाजाची तयारी होऊ लागली आहे. सरकार कर रुपी महसुलावर चालते आणि तो महसूल जनतेकडून घेतला जातो, याला तर काही पर्याय नाही. मात्र तो कसा आणि किती घ्यावा, या प्रश्नाचे उत्तर 'अर्थ' कळल्याशिवाय देता येत नाही. हे महत्व ज्या समाजांना कळाले, त्या समाजांनी त्याची चांगली व्यवस्था तयार केली आणि ते विकसित झाले. त्यांच्या अनेक गोष्टी आपल्याला घ्याव्या लागल्या. त्या आपण घेतल्याही. मात्र याचा अर्थ असा नाही की आपल्या सर्वच प्रश्नाची उत्तरे तेथून आयात करायची! कर पद्धतीची आयात अशीच धोक्याची आहे. पण त्याआधी करांचे हे महत्व समजून घेतले पाहिजे.

खरे म्हणजे मार्च संपला की करांची चर्चा संपली पाहिजे, पण गेल्या काही वर्षात तसे होत नाही, ही फार चांगली गोष्ट आहे. बारा महिने २४ तास सरकार, उद्योजक, व्यावसायिक आणि काही प्रमाणात नागरिकही करांची चर्चा करू लागले आहेत. त्याचे कारण असे आहे की करांचे इतके व्यापक परिणाम दैनंदिन आयुष्यावर होऊ लागले आहेत की त्यांचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. गेल्या महिन्याभरातील घटना पाहिल्या की लक्षात येते की शेअर बाजार कोसळला तो सरकारने परकीय गुंतवणूकदारांकडून कर वसूल करण्याचे जाहीर केल्यामुळे. अर्थमंत्री अरुण जेटली अमेरिकेत गेले आणि त्यांना भारतीय करव्यवस्थेविषयीच बोलावे लागले. अर्थराज्यमंत्री सिन्हा दिल्लीत बोलले ते पण जीडीपी आणि करांच्या भारतातील व्यस्त म्हणजे कमी प्रमाणाविषयी. एप्रिल २०१६ पासून सरकारला वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी करप्रणाली लागू करायची आहे, मात्र त्याविषयी एकमत होत नसल्याने सरकार बैठकांवर बैठका घेते आहे. बत्तीस प्रकारच्या करांनी तिजोरी भरत नसल्याने दात कोरून पोट भरण्याचे प्रयत्न सरकार सोडू शकत नाही. त्यामुळेच खात्रीच्या नोकरवर्गावर सरकार पुन्हा लक्ष केंद्रित करते आणि त्याच्या परदेशगमन आणि तेथे केलेल्या खर्चाची तपासणी केली जाईल, असे जाहीर केले जाते. पण त्यामुळे उच्च मध्यमवर्ग दुखावेल या भीतीने तसे

केले जाणार नाही, अशी सारवासारव केली जाते. याचा दुसरा अर्थ असा की काळा का होईना पण पैसा फिरता ठेवा बाबानो, अशी भूमिका सरकारला घ्यावी लागते! नागरिकही अनैतिक मागण्या करू लागतात आणि सरकारही त्याला आक्षेप घेऊ शकत नाही, अशा एका विचित्र स्थितीत आपण अडकलो आहोत.

पीटर्सन इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल इकोनॉमिक्स या वॉशिंग्टनच्या संस्थेत अरुण जेटली यांनी करप्रणालीविषयी जी विधाने केली ती पाहिली की लक्षात येते की आपल्याला अजून किती लांबचा पल्ला गाठावयाचा आहे. भारताने प्रशासकीय सुधारणा सुरु केल्या असून आधुनिक आणि त्याच्याशी अनुकूल अशी करपद्धतीच्या दिशेने आम्ही चाललो आहोत, असे ते म्हणाले. ते एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी अशा आधुनिक पद्धतीमुळे भारताचा विकासदर दहावर म्हणजे जगात सर्वाधिक होईल, असा दावा केला. अशी ही पद्धती पारदर्शी, विश्वासावर आधारित, करदात्याला त्रास न देणारी आणि तरीही करचोरीला थारा न देणारी असली पाहिजे, असा आज स्वप्नवत वाटणाऱ्या पद्धतीचा त्यांनी पुरस्कार केला. (अशी मांडणी आतापर्यंत आर्य चाणक्य आणि 'अर्थक्रांती'नेच केली आहे.) ते तेथे भाषण देत होते तेव्हा इकडे शेअरबाजारातील परकीय गुंतवणूकदार बिथरले होते आणि बाजाराला खाली खेचत होते. पूर्वलक्षी प्रभावाने सरकार कर घेणार असल्याच्या बातम्या त्याचवेळी प्रसिद्ध होत होत्या. तर प्राप्तीकर भरणारे, आता आपल्यामागे करांचा आणखी ससेमिरा लागणार, या विचाराने त्रस्त होते.याचा अर्थ सरकार काहीही म्हणत असले तरी सध्याच्या किचकट, अन्यायी, भेदभाव करणाऱ्या करपद्धतीतून आपली सुटका होईल, असे कोणाला वाटत नाही.

भारत सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था वर्षाला साधारण १५ लाख कोटी रुपये इतका कर वसूल करतात. हा आकडा प्रथमदर्शी जास्त वाटत असला तरी तो १२५ कोटी जनतेचा आणि जगातला सातव्या क्रमांकाच्या देशाचा संसार सांभाळण्यासाठी अजिबात पुरेसा नाही. जगात भारताशी तुलना करावी अशा देशांत जीडीपीशी करांचे प्रमाण किमान ३० टक्के असे आहे, भारतात ते १० ते जास्तीतजास्त १४ टक्क्यांवर थांबते. याचा अर्थ जे आणखी किमान १५ लाख कोटी सरकारी तिजोरीत जमा झाले पाहिजे, ते होत नाहीत. म्हणजे ते खासगी हातातच राहतात. (अब्जाधीश आणि कोट्याधीशांची संख्या भारतात वेगाने वाढते आहे, ती उगाच नव्हे!) तिजोरीत पुरेसा पैसा जमा होत नसल्याने आपले सरकार एकतर नवे कर लावण्याच्या प्रयत्नात असते किंवा आहे त्या करांत वाढ करत असते. जेटली यांनी अर्थसंकल्पात सेवाकरात सरसकट केलेली वाढ ही अशीच आहे. कर चोरीला दुसरी एक बाजू आहे. करप्रशासन इतके भ्रष्ट आहे की करांची वसुली जणू त्यांच्यासाठीच केली जाते! मोठी करचोरी करणारे आणि त्यावर गब्बर झालेल्या नोकरशाहीला जेटली म्हणतात तशी आधुनिक करपद्धती नको आहे. त्यामुळे आहे त्यात काहीच बदल होऊ नये, याची काळजी त्यातील भ्रष्ट अधिकारी आणि पोटभरू अर्थतज्ञ करत राहतात. त्याचा परिणाम म्हणजे सरकार अनेक महत्त्वाकांक्षी योजना हाती घेते, पण करांचे हे जंजाळ सरकारला हलू देत नाही.

सरकारही करांच्या या जाळ्यात कसे अडकले आहे, हे समजून घेऊ. नरेंद्र मोदी सरकारने 'मेक इन इंडिया' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला. पण भारतात भांडवल महाग असल्याने आणि काही करदरही अधिक असल्याने अनेक वस्तूंची आयात करणे स्वस्त झाले आहे. अशा विदेशात उत्पादन झालेल्या वस्तू देशात तयार होणाऱ्या वस्तूंपेक्षा स्वस्त असतील तर त्या विकायच्या कशा, या चिंतेने उत्पादन सुरु करण्याचे धाडसच होत नाही. त्यात भर पडली काळ्या पैशांची. त्याचे प्रमाण एवढे वाढले आहे की जमीन आणि सोन्याला जेवढी मागणी




भारतात आहे, ती जगाच्या पाठीवर कोठेही नाही. काळ्या पैशांच्या वाढत्या प्रमाणाने महागाई वाढते. महागाई, चढे व्याजदर, महाग जमीन आणि किचकट कर, यामुळे भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत टिकू शकत नाहीत. त्याचा थेट परिणाम म्हणजे प्रचंड आयात आणि कमी निर्यात. असे हे व्यापारातील तुटीचे लोण सरकारच्या तिजोरीतील तुटीपर्यंत पोचते.

सरकारहा गुंता जाणून आहे आणि या व्यवस्थेत आमुलाग्र बदल केल्याशिवाय हे दुष्टचक्र थांबणार नाही, हेही त्याला माहीत आहे. त्यामुळेच जागतिक व्यासपीठावर बोलण्याची वेळ येते तेव्हा आधुनिक करपद्धतीचा पुरस्कार केला जातो. नरेंद्र मोदी यांनी तर प्रचारा दरम्यान करांचा विषय जनतेपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. मात्र करपद्धतीचेमहत्व आणि सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षमअसण्याने किती सकारात्मक बदल होऊ शकतात, याविषयी व्यापक आणि खुली चर्चा अजून देशात होऊ शकत नाही. ज्या देशाचे सरकार लाचार असते, त्या देशाची जनता लाचार होण्यास वेळ लागत नाही, हे जेव्हा अधिकाधिक भारतीयांना कळेल, तेव्हा करपद्धतीत आमुलाग्र बदल करण्याचा रेटा वाढत जाईल. तो दिवस दूर नाही, जेव्हा या देशाची नजीकच्या भविष्यकाळातील निवडणूक करपद्धतीत आमुलाग्र बदलावर लढविली जाईल. ■